# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१७

## धुळे जिल्हा पोलीस शिपाई भरती सन-२०१७

## पोलीस अधीक्षक धुळे

जाहिरात क्रमांक -१ ठिकाण पोलीस अधीक्षक धुळे दिनांक २३/०२ /२०१६

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (शा.नि.क्र.जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१, दिनांक १५/०१/२०१६ अन्वये),महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष )(सेवाप्रवेश) नियम-२०१२ व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार धुळे जिल्हा पोलीस दलात रिक्त असलेल्या पदांपैकी शासनाने मंजुरी दिलेली ७५ टक्के पदेच भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजीत करण्यांत येत आहे.

१) पोलीस शिपाई :-

| | खुला | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ७ | १३ | ८ | २ | २ | २ | ४ | २ | ६ | ४६ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ४ | ३ | ५ | १ | १ | १ | २ | १ | ३ | २१ |
| महिला | २ | ४ | २ | - | १ | १ | १ | १ | २ | १४ |
| खेळाडु | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| प्रकल्पग्रस्त | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | १ | २ | १ | - | - | - | १ | - | १ | ६ |
| अंशकालीन पदवीधर | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| पोलीस पाल्य | - | - | - | १ | - | - | - | - | - | १ |
| गृहरक्षक दल | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ७ | १३ | ८ | २ | २ | २ | ४ | २ | ६ | ४६ |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१७ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यांत आलेली आहेत.सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागिल अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यांत आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येईल.सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल.निवड यादीमध्ये नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क)पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होवून पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली १९९९ - भाग ३ मधिल नियम ४० व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहीत केलेली कर्तव्य पार पाडावी लागतील.

ड) सध्या पोलीस विभागात वाहन चालकांची स्वतंत्ररितीने पदे भरली जात नसल्यामुळे पोलीस शिपाई पदी नियुक्ती झाल्यावर संबंधीत पोलीस विभागात वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहील. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

इ) वर दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे.त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्यांचा हक्क राहणार नाही.

ई) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅण्ड पथकातील पोलीस शिपायांची रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध नाहीत.

उ) कारागृह विभागात बॅन्डस्मन हे पद मंजुर नाही.

३)महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी **पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११,** वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणासह (शा.नि.क्र.जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१,दि. १५/०१/२०१६ अन्वये),लागु आहेत.तसेच राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी **महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम-२०१२** हे नियम लागु आहेत.सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणासह mahapolice.mahaonline.gov.in **या संकेतस्थळावर (Home Page) वर व www.dhulepolice.gov.in वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागु राहतील.**

४) आवेदन अर्ज सादर करण्यांचा दिनांक व वेळ :-

जाहिरातीतील नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार खाली दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरु शकतात. आवेदन अर्ज सादर करण्यांचा दिनांक, वेळ व ऑनलाईन पध्दतीतील आवेदन अर्ज mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक २४/२/२०१७ ते दि. १७ /०३ /२०१७ रोजी सांयकाळी २४.०० वा.पर्यंत** भरावेत. विहीत मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज स्विकारण्यांची प्रक्रिया बंद करण्यांत येईल. उमेदवारांना पोलीस भरतीचा संपुर्ण प्रक्रियेबाबतची माहिती, रुपरेखा(Shedule) mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

जाहिरातीत नमुद अटींची पात्रता/अर्हता पुर्तता करणारे उमेदवार यांनी खाली दिलेल्या विहीत दिनांकाचा मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरावेत.

| | | |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ | दि. २४/२/२०१७ रोजी ००.०० वा .पासुन |
| २. | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची अंतीम दिनांक व वेळ | दि.१७/३/२०१७ रोजी २४.०० वा पर्यंत |
| ३ | स्टेट बँकेत पैसे भरण्यांचा शेवटचा दिनांक | दि. २१/३/२०१७ रोजी (बँकेच्या वेळेनुसार) |

५) पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमुद वय, शैक्षणिक व शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे.

i. वयोमर्यादा :-

अ) जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी दि.३१/०३/२०१७ रोजी कमीत कमी १८ वर्ष पुर्ण आणि जास्तित जास्त २८ वर्ष (मागासवर्गिय उमेदवारांसाठी जास्तीत जास्त ३३ वर्षे)

ब) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रकल्प/१००६/मु.स.३६९/प्र.क्र.-५६/०६/१६-अ,मंत्रालय दि.०३ फेब्रुवारी ,२००७ अन्वये प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त उमेदवारांच्या समांतर आरक्षणासाठी दि.३१/०३/२०१७ रोजी उमेदवाराची किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा अधिक नसावी.